शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

स्पेसिफिकेशन २००९-१०

निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक - ८/१२/२००९

वेळ-दुपारी १.०० वाजेपर्यन्त

बयाणा रक्कम रूपये २५,०००/-

<u>बालवाडी खाऊ</u>

शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या बालवाडीतील विद्यार्थ्यांकरिता खालीलप्रमाणे खाऊ खरेदीकरावयाचा आहे.

गट	तपशील	
अ	ड्रायफूट - अंदाजे वजन ६० ग्रॅम	४ आख्खे काजू, ४ बदाम, ४ मोठया खारका, १५ ग्रॅम खडीसाखर, १५ ग्रॅम मनुके
ब	पायनापल शिरा - वजन १०० ग्रॅम	साजूक तूपातील
क	बिस्कीट	२ श्रृजबेरी बिस्कीटे, २ बटर बिस्कीटे, २ खोबरा बिस्कीटे
ड	इडली	अंदाजे वजन १०० ग्रॅम
इ	गुलाबजाम	दोन सुके मोठे गुलाबजाम
ई	फळे	मध्यम आकाराचे सफरचंद १, मोसंबी १ , केळी१ प्रत्येक फळाचा वेगवेगळा दर द्यावा.
उ	शेंगदानणे लाडू	वजन ५० ग्रॅम

वरील पदार्थ खाल्यामुळे विद्यार्थ्यांना अपाय होणार नाही याची जबाबदारी पुरवठादारावर राहील . वरील प्रत्येक गटाचा वेगवेगळा दर देण्यात यावा. तसेच सर्व पदार्थांकरिता वापरण्यात येणारे सर्व घटकपदार्थ आृाय.एस.आय.मार्कचे असावेत. स्पेसिफिकेशप्रमाणे माल आढळून न आल्यास तसेच तो भुग्याच्या स्वरूपात असल्यास निविदेतील अटींचा भंग झाला आहे असे समजून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. दर सर्व कर व वाहतूकीसह देण्यात यावा.

वरील खाऊ पैकी कोणताही एका प्रकारचा खाऊ मा.शिक्षण मंडळ ठरवेल त्याप्रमाणे बालवाडीच्या विद्यार्थ्यांकरिता दररोज किंवा आठवडयातून दोन किंवा तीन दिवस प्रत्येक बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांना पुरवावा लागेल.

निविदेसोबत खाऊचा नमुना देणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी
अध्यक्ष,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

स्वाक्षरी
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

शिवाजी नगर, पुणे ४११ ००५

बालवाडी खाऊ

निविदा अटी व शर्ती २००९–१०

१) **संदर्भः**– पुणे दैनिक लोकसत्ता` ,दैनिक सांजवार्ता दि.२/१२/२००९ मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र.२०/ **बालवाडी ज्ञिज्ञट्ट** ळक्षिंषे.ज्ञीलज्ञली **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणे :–**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा., पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या **खरेदी समितीने** शैक्षणिक आर्थिक वर्ष २००९–१० चे करीता खालील **परिशिष्ठ अ** मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ठ ब** मध्ये नमुद केलेल्या त्या त्या एकुण संख्येमध्येँ विशिष्ठ मुदतीत पुरवठ्यासाठी निवीदा अटी व शर्ती खालील प्रमाणे

परिशिष्ठ अ

२) **अटी व शर्ती**

१. निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२. निविदेसाठी एक लिफाफा पद्धत असुन पाकीटामध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

३) **पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे**

अ) निवीदा रकमेच्या शेकडा १ % या दराने बयाणा रक्कम म्हणुन राष्ट्रीयकृत बँकेचा मा. शिक्षण प्रमुख,शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा., पुणे यांचे नावे काढलेला धनाकर्ष (डि.डि.)कार्यालयात भरावा.

ब) निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

क) निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बँकेचे प्रमाणपत्र निवीदेच्या एकुण किमतीच्या किमान २५% रकमेचे.

ड) सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे कामी सादर करावी लागतील.

४) पाकीटज्ञमध्ये निवीदा धारकाने स्पेसिफीकेशनप्रमाणे बाब निहाय सर्व करासह दर भरावेत पाकीट सिल बंद करून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्र. नमुद करून सादर करावी.

५) पाकीटामध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास याबाबत खरेदी समितीचा निर्णय अंतिम राहिल.

६) विहीत नमुन्यातील दर पत्रक , सर्व करासह द्यावे.

७) **निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अंशतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे .

३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीचा आहे.

४. मान्य निवीदा धारकास निवीदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निवीदादाराने असर्मथता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबंधिताकडुन वसुल करण्यात येईल.

५. मान्य निवीदादारास करार करते वेळी एकुण किमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणुन शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष(डि.डि.) ने भरावी लागेल.

६. निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २००९-१० करीताच करार केल्यापासुन बंधनकारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे **बालवाडी खाऊ** न पुरविल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास ब्लॅक लिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहील. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबंधित ठेकेदाराविरुध्द लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

9. **बालवाडी खाऊ** व्यवस्थित पुरविल्याबाबत तपासून घेवून व मा.खरेदी समितीची पाहणी झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही. तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१०. एकदा भरलेली निविदा रद्द करता येणार नाही एखाद्याला ती जर रद्द करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहील. तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणुन वसूल करण्यात येईल.

११. मा. शिक्षण मंडळाने निविदे मध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापूर्वी कोणासही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा रक्कम घेताना बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१२. **बालवाडी खाऊ** पुरविणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारानाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबंधीत वाद निर्णयाकरीता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१३. मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवुन दिलेल्या मुदतीत **बालवाडी खाऊ** पुरविल्याबाबतचे देयक मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा. पुणे यांचे नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. त्या शिवाय कोणत्याही परिस्थतीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

१४. निवीदा दिनांक ८/१२/२००९ रोजी दुपारी ३.00 वाजता उघडण्यात येतील, वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थीत राहु शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निवीदा न उघडल्यास निवीदा उघडण्याचा नविन दिनांक सहभागी निवीदादारास दुरध्वनी वरून कळविण्यात येईल वेळी व त्याप्रसंगी निवीदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

पुणे दिनांकः-

अध्यक्ष,
शिक्षण मंडळ,पुणे मनपा

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ पुणे म.न. पा.

प्रतिज्ञालेख

मी, श्री. ...., वय ..... व्यवसाय-धंदा, रा. ....,

निवीदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करीतो की, वरील निवीदेच्या, फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत, त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदा सोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत म्हणुन सदर प्रतीज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करून निवीदा सोबत दाखल करत आहे.

बालवाडी खाऊ पुरविणेबाबत सही व शिक्का